९३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क्रीडा विभाग, पिंपरी – १८
जा.क्र.क्रीडा/१/कावि/ ३१ /२०१९
दिनांक - ७/०१/२०१९

विषय – माहिती अधिकारी अधिनियम,२००५
नागरिकांना अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करून देणेबाबत...

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरी सुविधा केंद्र विभागाने परिपत्रक क्र.नासुके/१/कावि०९/२०१९ दि.०५/०१/२०१९ अन्वये शासकीय परिपत्रक क्र. संकिर्ण २०१८/प्र.क्र. ४५/कार्या-६ नुसार शासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता येण्यासाठी व माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त माहिती अर्जाची, प्रथम व द्वितीय अपिलीय अर्जाची संख्या कमी होण्याच्या दृष्टीने राज्यातील जिल्हास्तरीय कार्यालयापासून ते निमस्तरीय सर्व कार्यालयात तसेच महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद इत्यादि सर्व कार्यालयात प्रत्येक सोमवारी किंवा सदर दिवशी सार्वजनीक सुट्टी असल्यास त्यानंतरच्या कार्यालयीन दिवशी दुपारी ३ ते ५ या वेळेत नागरीकांना माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत विहित प्रक्रियेनुसार त्यांच्या मागणीनुसार अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देणेबाबत कळविले आहे.

सबब क्रीडा विभागातील जनमाहिती अधिकारी व सर्व संबंधीत कर्मचारी यांना सदरचे परिपत्रकान्वये सुचित करणेत येते कि, उपरोक्त शासन परिपकान्वये महाराष्ट्र शासनाने विहित केलेल्या दरानुसार नागरिकांना अभिलेख अवलोकनासाठी पहिला तास मोफत व त्यानंतर प्रत्येक पंधरा मिनिटांना किंवा त्याच्या भागास रक्कम रुपये ५/- या प्रमाणे प्रत्येक सोमवारी किंवा सदर दिवशी सार्वजनिक सट्टी असल्यास त्यानंतरच्या कार्यालयीन दिवशी दु.३ ते ५ या वेळेत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ६(१) व कलम ४ ब नुसार अभिलेखांची पाहणी करण्यास मोबाईल अथवा इतर अत्याधुनिक साधनांचा वापर न करता अभिलेख उपलब्ध करून द्यावेत. त्तरी सदर परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे तात्काळ करणेत यावी.

आशा राऊत
सहा आयुक्त (क्रीडा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

१) जनमाहिती अधिकारी
२) सर्व संबंधीत कर्मचारी